# सामाजिक न्याय विभागाअंतर्गत शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्याकरीता प्रसिध्द निविदेसंदर्भात दि.७/११/२०१३ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांचे कक्षात आयोजित निविदापुर्व बैठक (प्रिबीड मिटींग).

## * इतिवृत्त *

प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती या कार्यालयाने दि.२३/१०/२०१३ रोजी शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरविण्याबाबत कंत्राटाची प्रकाशित केलेल्या जाहिरातीनुसार दि.७/११/२०१३ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती यांचे कक्षात प्रिबीड मिटींग आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, अमरावती, सहाय्यक संचालक (लेखा), लेखाधिकारी, संबंधीत निविदा लिपीक तसेच खालील संस्थांचे पदाधिकारी / प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | लेखा एंटरप्राईजेस, अकोला | व्यवस्थापक |
| २ | सुशिक्षीत बेरोजगार सह. संस्था,अकोला | सचिव |
| ३ | स्वास्तीक बेरोजगाराची सहकारी संस्था, अमरावती | सदस्य |
| ४ | बिना एंटरप्राईजेस, अमरावती | सदस्य |
| ५ | अमरावती नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती | अध्यक्ष |
| ६ | बिस्क फॅसिलीटीज प्रायव्हेट लि., पुणे | प्रतिनिधी |
| ७ | बेरोजगारांची क्षितीज नागरी सेवा सहकारी संस्था, अमरावती | सदस्य |
| ८ | सुजाता महिला बचत गट, वाशिम | व्यवस्थापक |

सदर सभेमध्ये निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्राबाबत चर्चा करण्यात आली त्यावेळी तांत्रिक लिफाफ्याकरीता आवश्यक कागदपत्रांमध्ये अ.क्र.डी वर खाद्यपेय विक्रीचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला मागविण्यात आला आहे. सदरचा दाखला महानगरपालिकेकडून पुर्वी निर्गमीत केल्या जात होता, परंतु सद्यस्थितीत महानगरपालिके कडून असा दाखला निर्गमीत केला जात नाही असा मुद्दा उपस्थित प्रतिनिधींनी मांडला असता

२....

अन्न व औषध प्रशासन विभागाकडे याबाबत विचारणा केली असता निविदा भरण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून निर्गमीत केलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे असे सांगीतल्यामुळे त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरले.

तसेच उपस्थितांपैकी अ.क्र.२ व ६ यांनी दिलेले निवेदन मा.आयुक्त, समाज कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पुढील मार्गदर्शनाकरीता पाठविण्या बाबत कार्यवाही करण्याचे ठरले. उपस्थितांनी असा मुद्दा उपस्थित केला की, काही कारणास्तव सदरची निविदा प्रक्रिया रद्द झाल्यास निविदा फॉर्म रक्कम परत मिळेल काय? याबाबत शासन स्तरावरून जसे आदेश येतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे ठरले.

वरीलप्रमाणे चर्चा होऊन सभेचे कामकाज संपविण्यात आले.

प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, अमरावती